सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ७ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## सुवेंदु अधिकारी यांच्या PA ची गोळ्या झाडून हत्या:१० राउंड फायरिंग

### २ गोळ्या छातीच्या आरपार, एक पोटात लागली; नंबर प्लेट नसलेल्या बाइकचा वापर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७कोलकाता**

पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम येथे बुधवारी रात्री १०:३० वाजता भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे वैयक्तिक सहाय्यक (पीए) चंद्रनाथ रथ (४२) यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. घटनेच्या वेळी चंद्रनाथ स्कॉर्पिओ गाडीतून कोलकाताहून मध्यमग्राममधील आपल्या घरी परतत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ते चालक आणि आणखी एका व्यक्तीच्या शेजारी बसले होते. कोलकातापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या दोलतला आणि मध्यमग्रामच्या दरम्यान, मागून आलेल्या एका कारने स्कॉर्पिओचा रस्ता अडवला.

त्यानंतर हल्लेखोर मोटारसायकलवरून आला आणि त्याने स्कॉर्पिओच्या डाव्या बाजूने सहा ते दहा गोळ्या झाडल्या. चंद्रनाथ यांना चार गोळ्या लागल्या, त्यापैकी दोन त्यांच्या छातीत आणि एक पोटात घुसली. चालक बुद्धदेव बेरा यांनाही गोळी लागली.




घटनेनंतर हल्लेखोरांनी गाडी सोडून मोटारसायकलवरून पळ काढला. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी चंद्रनाथ यांना मृत घोषित केले. चालकाची प्रकृती गंभीर आहे. भाजपने ही घटना घडवल्याचा आरोप टीएमसीवर केला आहे.



न्यायवैद्यक तपासातील प्राथमिक माहितीनुसार, हल्लेखोरांनी ग्लॉक ४७द पिस्तुलाचा वापर केला. सामान्य गुन्हेगार इतके अत्याधुनिक शस्त्र वापरत नाहीत. हल्ल्याची पद्धत केवळ एका व्यावसायिक नेमबाजानेच केली असावी.

बाईकवरून आलेल्या हल्लेखोराने हेल्मेट घातले होते आणि बाईकला नंबर प्लेट नव्हती. पोलिसांनी घटनास्थळावरून स्कॉर्पिओचा मार्ग अडवणारी कार जप्त केली आहे. मात्र, त्या वाहनावरील नंबर प्लेट बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे.चंद्रनाथ रथावरील गोळीबारानंतर सुमारे एका तासाने, रात्री १२:३० च्या सुमारास बसीरहाट जिल्ह्यात रोहित रॉय नावाच्या भाजप कार्यकर्त्यावर गोळीबार झाला. त्यांची प्रकृती गंभीर आहे. ४ मे रोजी निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून राज्यात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी तिघे भाजपशी आणि दोघे टीएमसीशी संबंधित होते.

---

## देशातील १३ राज्यांत वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा
### ताशी ६० किमी वेगाने वाहणार वारे

**दि.७नवी दिल्ली-**

उत्तर प्रदेश, तामिळनाडू, केरळ, पुदुचेरीसह अनेक राज्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान खात्याने देशातील अनेक भागात पुढील काही दिवसांपर्यंत जोरदार पाऊस, वादळी वारे आणि वीज कोसळण्याच्या अलर्ट जारी केला आहे. १० ते १२ मे कालावधीत उत्तर पश्चिम भारतात हवामानात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वारे ताशी ४० ते ६० किलोमीटर वेगाने वाहू शकतात.

खचऊ च्या माहितीनुसार, पुढील काही दिवसात उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाणा, राजस्थान, हिमाचल प्रदेशातील



काही भागात पावसाची शक्यता आहे. तर केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी या भागात ६-७ दिवसांपर्यंत मेघगर्जना आणि वेगवान वाऱ्यासह पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. दक्षिण भारतातील केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्येही मुसळधार पावसाची शक्यता आहे. बिहार, विदर्भ आणि तेलंगणामध्ये गारपिटीची शक्यता आहे.

९ मे रोजी पश्चिम बंगालमध्ये ताशी ७० किमी वेगापर्यंत सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि झारखंडमध्येही सोसाट्याचा वारा आणि वीज कोसळण्याचा धोका असेल.

---

## सुनेत्रा पवारांच्या जागेसाठी राष्ट्रवादीत जोरदार लॉबिंग
### राज्यसभेसाठी पाच बडे नेते रिंगणात; महिला आयोगाच्या पदावरही चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बारामती** – राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर पक्षात मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर कोणाला संधी मिळणार याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. पक्षातील अनेक नेत्यांनी या जागेसाठी रस दाखवल्याने राष्ट्रवादीमध्ये अंतर्गत स्पर्धा वाढल्याचे चित्र दिसत आहे. राज्यसभेच्या जागेसोबतच पक्षातील इतर महत्त्वाच्या रिक्त पदांवरही लवकरच निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या राज्यसभेच्या जागेसाठी सध्या अनेक दिग्गज नेत्यांची नावे चर्चेत आहेत. आनंद परांजपे, भुजबळ कुटुंबीय, मलिक कुटुंबीय, अविनाश आदिक आणि विक्रम काकडे ही प्रमुख नावे इच्छुकांच्या यादीत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पक्षात कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सुनेत्रा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे इच्छुक नेत्यांची सतत भेटीगाठी सुरू असल्याचीही चर्चा आहे. मात्र, अंतिम निर्णयाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.



राज्यसभेच्या जागेबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक महत्त्वाची संघटनात्मक पदे सध्या रिक्त आहेत. युवक प्रदेशाध्यक्षपद गेल्या दहा महिन्यांपासून रिकामे आहे. सूरज चव्हाण यांना पदावरून दूर केल्यानंतर अद्याप नव्या अध्यक्षाची नियुक्ती झालेली नाही. त्याचबरोबर रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर महिला आयोग आणि महिला प्रदेशाध्यक्षपदही रिक्त आहे. त्यामुळे पक्ष संघटनेत अनेक बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबई प्रदेशाध्यक्षपदाबाबतही राष्ट्रवादीत अनिश्चितता कायम आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात समीर भुजबळ यांनी मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटूनही या पदावर कोणाची नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे आगामी काळात पक्षातील अनेक रिक्त जागा एकाचवेळी भरल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या सर्व नियुक्त्यांमुळे पक्षातील गटबाजी आणि समीकरणांवरही परिणाम होणार असल्याची चर्चा सुरू आहे.

---

## २०२९ मध्ये सुनेत्रा पवारच बारामतीतून लढतील
### त्यांनीच मुख्यमंत्री व्हावे; जय पवारांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बारामती** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभेच्या जागेवर सुनेत्रा पवार या निवडून आलेल्या आहेत. परंतु, २०२९ मध्ये बारामतीतून कोण लढणार? अशी चर्चा रंगली होती. 'मी निवडणूक लढावी,' अशी बारामतीतील लोकांची इच्छा आहे, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार ) नेते, जय पवार यांनी केले होते. त्यामुळे पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार, असा सामना होणार, असे बोललं जात होते.

परंतु, खासदार सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार यांनी पुन्हा पवार विरुद्ध पवार, अशी लढत होऊ नये, यासाठी प्रयत्न करणार




असल्याचे सांगितलेलं. यातच आता २०२९ मधून पुन्हा सुनेत्रा पवारच निवडणूक लढतील. त्यासह २०२९ मध्ये सुनेत्रा पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, असे विधान जय पवार यांनी केले आहे. जय पवार यांनी बारामतीत जनता दरबार घेतला होता. त्यानंतर जय पवार प्रसार माध्यमांशी बारामतीतीत वाढत्या गुन्हेगारीबद्दल बोलताना जय पवार म्हणाले, बारामतीतील गुन्ह्यांची माहिती मला मिळाली. अजित पवार असताना ज्यापद्धतीने कायद्याचा धाक होता, तसाच यापुढेही राहणार आहे. मी सुनेत्रा पवार आणि पोलिसांशी बोललो आहे. राज्यसभेच्या जागेसाठी माझ्या नावाची चर्चा होत आहे. पण, माझी तशी इच्छा नाही. मी कार्यकर्त्यांच्या कामासाठी असणार आहे, असे स्पष्टीकरण जय पवारांनी दिलं.अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, ही बारामतीकरांची इच्छा होती. आता सुनेत्रा पवार खूप कष्ट घेत आहेत. २०२९ च्या विधानसभा निवडणूक सुनेत्रा पवारच लढवतील. सुनेत्रा पवार मुख्यमंत्री व्हाव्यात, अशी आमची आशा आहे, असेही जय पवारांनी बोलून दाखवलं आहे. संवाद साधत होते.

---

### शिक्षण विभागाचा नवा निर्णय
## आता शिक्षकांना दर महिना दोन तासांचे ऑनलाइन प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७पुणे**

आधुनिक अध्यापन पद्धती, नवकल्पना आणि शिक्षकांच्या ज्ञान, कौशल्यात वाढ करण्यासाठी राज्यातील शिक्षकांना दरवर्षी किमान घड्याळी ५० तासांचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन असे स्वरूप असलेल्या प्रशिक्षणामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक यांचा समावेश असून, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रशिक्षणाचे नियोजन केले जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार २१ व्या शतकातील कौशल्ये आत्मसात करताना शिक्षकांनी नवतंत्रज्ञान, डिजिटल साधने आणि विद्यार्थिकेंद्रित अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामुळे किमान घड्याळी ५० तासांचे प्रशिक्षण शिक्षकांना अनिवार्य करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचे राज्यस्तरीय नियोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे केले जाणार आहे, तर जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. इतर कोणत्याही संस्था, स्वयंसेवी संघटना किंवा सीएसआरच्या माध्यमातून स्वतंत्र प्रशिक्षण आयोजित करता येणार नाही. अन्य संस्थांच्या प्रशिक्षण साहित्याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाच्या मुख्य आराखड्यात त्याचा समावेश करण्याच्या



सूचना देण्यात आल्या आहेत.


दरवर्षी एप्रिलमध्येच महिन्यात संपूर्ण वर्षभराचा प्रशिक्षण आराखडा जाहीर केला जाणार आहे. त्यात ऑनलाइन, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि शिक्षण परिषदांचा समावेश असणार आहे. या आराखड्यामुळे शिक्षकांना शालेय अध्यापन, रजांचे नियोजन करता येईल. घड्याळी तासांनुसार प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर शिक्षकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

---

## विदर्भात १५ नव्या फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद
## सिरोंचामध्ये झाले संशोधन : १३७ प्रजाती आढळल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा वनविभागाच्या समृद्ध निसर्ग संपदेवर नव्या वैज्ञानिक अभ्यासाने प्रकाश टाकला आहे. या संशोधनात तब्बल १३७ प्रजातींच्या फुलपाखरांची नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी १५ प्रजाती विदर्भात पहिल्यांदाच आढळल्या आहेत. या शोधामुळे सिरोंचाच्या जंगलांचे महत्त्व राष्ट्रीयस्तरावर अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या नागपूर येथील विशेष कक्षाच्या संचालक पुनम पाटे (आयएफएस), वनपाल ए. डब्ल्यू. तलांडी, एल. एच. चौधरी आणि कीटकशास्त्रज्ञ डॉ. आशिष टिपले यांच्या चमूने हे सर्वेक्षण पूर्ण केले. विदर्भात प्रथमच दिसलेल्या प्रजातींमध्ये ब्लॅकविन सर्जट, इंडियन सनबर्म, इंडिगो प्लॅश, कॉपर फ्लॅश



आणि जायन्ट रेडआय यांसारख्या अत्यंत दुर्मीळ फुलपाखरांचा समावेश आहे. फुलपाखरे हे पर्यावरणाचे उत्तम जैव-सूचक मानले जातात. ज्या भागात फुलपाखरांची विविधता अधिक, तिथला जैवविविधा उत्तम असल्याचे द्योतक मानले जाते. सिरोंचातील उष्णकटिबंधीय दमट आणि कोरड्या पानझडी वनांचे मिश्रण या कीटकांसाठी पोषक ठरले आहे. विशेष म्हणजे, या अभ्यासात आढळलेल्या १९ प्रजाती भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत संरक्षित आहेत. वर्षभर चाललेल्या या सर्वेक्षणात पद्धतशीर निरीक्षण आणि छायाचित्रणाद्वारे हा दस्तऐवज तयार करण्यात आला आहे. हे संशोधन भविष्यातील पर्यावरणीय अभ्यासासाठी दिशादर्शक ठरणार आहे. मात्र, वाढती वृक्षतोड,

अधिवास नष्ट होणे आणि मानवी हस्तक्षेपामुळे या दुर्मीळ प्रजातींना धोका निर्माण झाला असल्याचेही डॉ. आशिष टिपले यांनी सांगितले. शाश्वत वनव्यवस्थापन आणि पर्यावरण पर्यटनाच्या माध्यमातून या भागाचे जतन केल्यास स्थानिक रोजगार वाढण्यास मदत होईल, असा विश्वास पूनम पाटे यांनी व्यक्त केला आहे. हा पेपर जंगलातील जैवविविधतेचे दस्तऐवजीकरण करण्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. तो जंगलात सर्वाधिक वेळ घालवणाऱ्या आणि त्याबद्दल चांगले ज्ञान असलेल्या वन क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आला आहे.

## संपादकीय ......

# हतबल जनता, शक्तीहीन सरकार

*समाजात जी शिस्त आणि शिष्टाचार टिकून आहे, तो माणसांवर होणार्या संस्कारांपेक्षा कायद्याच्या भयाने टिकून आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. कारण लहान मुलांवर खोटे बोलू नये, दुसर्याचे वाईट करू नये असे संस्कार करण्यासाठी देवबाप्पा कान कापतो, अशी भीती त्याचे आईवडील दाखवत असतात. एखादे मूल ऐकत नसेल तर त्याला छडी दाखवून मार पडेल किंवा पोलीस पकडून नेतील, अशी भीती दाखवली जाते. म्हणजेच काय तर मानवाला संस्कारीत करण्यासाठी कशाची ना कशाची भीती दाखवावी लागते. म्हणूनच सामाजिक शिस्त बाळगावी, कुणाला उपद्रव देऊ नये, कुणावर अत्याचार करू नये, कुणाचा छळ करू नये, यासाठी नागरिकांना कायद्याचे भय दाखवणारी लोकशाही शासनप्रणालीत सरकार नावाची व्यवस्था असते. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची त्या सरकारची जबाबदारी असते. त्यासाठी सरकारकडे पोलीस, गुप्तहेर संस्था अशा यंत्रणा हाताशी असतात. त्या यंत्रणांचा प्रभावी वापर करून निरपराध नागरिकांचे जीवन सुसह्य करणे हे सरकारचे काम असते. त्यात सरकार जर कमी पडत असेल, तर तो सरकारचा दोष असतो, मग ते कुठल्याही पक्षाचे सरकार असो. पूर्वी राजेशाही होती, त्यावेळी राजा जर चांगला असेल, प्रजाहितदक्ष असेल तर विनाविलंब प्रकरणाची चौकशी होऊन आरोपीला अगदी अल्पावधीत शिक्षा होत असे. काही ठिकाणी तर ती कठोर शिक्षा सगळ्या जनतेसमोर दिली जात असे, त्यामुळे राज्यातील जनतेच्या मनात धाक निर्माण व्हावा. आपल्या हातून असे वाईट कृत्य घडले तर आपल्यालाही अशीच शिक्षा मिळेल, या भीतीने लोक तसे गुन्हे करण्यापासून परावृत्त होतील, असा त्यामागे विचार असे. अर्थात, आपल्याकडे लोकशाही शासनप्रणाली असल्यामुळे राजेशाहीसारखा झटकन न्याय होऊ शकत नाही. लोकशाहीत न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून न्याय केला जातो. पोलिसांना आरोपीने गुन्हा केला त्याविषयीचे पुरावे गोळा करावे लागतात. न्यायालयासमोर ते मांडवे लागतात. ते पडताळून पाहून गुन्हा सिद्ध झाल्यावर त्यानुसार न्यायालय त्या आरोपीला शिक्षा देत असते. असे जरी असले तरी लोकांना राज्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित आहे, याची खात्री पटण्यासाठी सत्ताधारी सरकारची मोठी जबाबदारी असते.*

*न्यायालय हे कायद्याची अंमलबजावणी करत असले तरी गुन्हगोरांना चाप बसेल असे कठोर कायदे हे संसद आणि विधिमंडळातच बनवले जात असतात, हे लक्षात घ्यावे लागेल. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी वेगाने आणि प्रखरपणे होत आहे की नाही, हे पाहणे ही सरकारची जबाबदारी आहे. एखादी घटना घडल्यानंतर लोक रस्त्यावर उतरून त्या आरोपीवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करत आहेत, आंदोलने करत आहेत, आणि सरकार आश्वासने देऊन वेळ मारून नेत असेल तर त्याला काही अर्थ राहत नाही. लोकांचे प्रश्न सुटावेत, कुणावर अन्याय होत असेल तर त्याला कायद्यानुसार न्याय मिळावा, अशी लोकांची अपेक्षा असते. तसे होत नसेल आणि सरकार केवळ त्या विषयावर समिती स्थापून तिच्या अहवालाशी खेळत राहत असेल तर ते सरकारचे अपयश मानावे लागेल. गंभीर घटना असेल, विशेषत: बालकांविषयी अत्याचार आणि क्रूरपणे हत्या केल्याचे कृत्य असेल तर लोकांच्या भावना अधिकच तीव्र असतात. त्यावेळी आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्याचा न्याय करतो, त्याला चौकात फाशी द्या, अशा मागण्या होतात. अशा मागणीसाठी केल्या जाणार्या आंदोलनांमध्ये काही राजकीय नेतेही उतरतात आणि अशा मागण्या करू लागतात. पण ते हे विसरतात की, आपले सरकार असले असते तरी आरोपीला चौकात फासावर देता आले असते का? पण अशा वेळी विरोधी बाकांवर असलेले राजकीय नेते आणि पक्ष आपली पोळी भाजून घेतात. जेव्हा समाजात कुठली अत्याचाराची घटना घडते तेव्हा आरोपीला कायद्यानुसार शिक्षा होण्यासाठी सगळ्याच राजकीय पक्षांनी प्रयत्न करायला हवे. कारण समाजाची जबाबदारी सगळ्याच राजकीय पक्षांची असते. कारण कुठल्याही पक्षाचे नेते असले तरी ते लोकप्रतिनिधी असतात. लोकांच्या हिताचा विचार करणे त्यांची जबाबदारी असते. अशा वेळी राजकीय श्रेयवादाची लढाई न लढता समाजात घडणार्या गुन्ह्यांना कसा आळा बसेल, गुन्हेगार गुन्हे करण्यापासून कसे परावृत्त होतील, हे पाहणे सर्व राजकीय पक्षांची जबाबदारी आहे. अशा वेळी लोकभावनेचा विचार करून काही वेळा पोलिसांकडून गुन्हेगारांचे इन्काऊंटर केले जाते. त्यावेळी जनता त्या पोलीस अधिकार्यांचा उदो उदो करते, पण पुढे त्याच पोलिसांना न्यायालयीन कारवाईला सामोरे जावे लागते आणि त्यात त्यांचा बळी जातो.*

*राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना बालक आणि महिलांच्या सुरक्षेसाठी राज्याच्या विधिमंडळात 'शक्ती' कायदा मंजूर करण्यात आला. तो केंद्र सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवला आहे, पण केंद्राने त्याला अजून मंजुरी दिली नाही. सध्या केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे. केंद्र आणि राज्य सरकार एकमेकांकडे बोट दाखवून वेळ काढत आहेत. तो कायदा असता तर नसरापूरच्या नराधमाला १५ ते २१ दिवसात फाशीची शिक्षा होऊ शकते आणि अशा गुन्हेगारांना चाप बसेल, असे महाविकास आघाडीतील तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. नसरापूर पाठोपाठ बालकांवर आणखी गुन्हे होत आहेत. आरोपींना फाशी द्या, अशी जनभावना उसळत आहे. पण सरकारच्या बाजूने फक्त फास्ट ट्रॅकची भाषा केली जात आहे. यापूर्वी महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडल्या तेव्हा न्यायालयात फास्ट ट्रॅकवर खटला चालवून आरोपीला शिक्षा झाल्याचे दिसले नाही. 'शक्ती' कायद्यामुळे आरोपीला १५ ते २१ दिवसात शिक्षा होणार असेल तर त्याला केंद्राने तात्काळ मंजुरी द्यायला हवी. त्यात श्रेयवाद आणू नये. कारण सरकार कुठल्याही पक्षाचे असले तरी जनहिताचे निर्णय तात्काळ घेणे हे त्याचे लोकशाही कर्तव्य असते.*

# चिवळीच्या भाजीला उन्हाळ्यात विशेष महत्त्व

## भाजी विदर्भाच्या खाद्य संस्कृतीची ओळख -भाजीला राज्यस्तरावर ओळख देण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अंजनगाव सुर्जी–** चिवळीची भाजी ज्याला ग्रामीण भाषेत चिवईची भाजी सुद्धा म्हटल्या जाते. विशेष म्हणजे ही भाजी उन्हाळ्यात खाल्ली जाते. कारण ही भाजी शरीरातील उष्णता कमी करते म्हणूनच विदर्भातील खाद्य संस्कृतीत चिवळीच्या भाजीला उन्हाळ्यामध्ये विशेष महत्त्व दिल्या जाते.

चिवळीची भाजी ही एक रानभाजी आहे. ज्याला चिवडी, चिवई, चिवळ तर कुठे चीगळ अशा वेगवेगळ्या नावाने ही भाजी ओळखली जाते. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात ही भाजी प्रामुख्याने दिसून येते. परंतु या भाजीची खरी मजा उन्हाळ्यातच घेतली जाते. ही भाजी बारीक चुरगोळ्यासारखी दिसते.



अगदी छोटी छोटी हिरवीगार पानं असलेल्या या भाजीला उन्हाळ्यामध्ये विशेष मागणी असते. ही शेतामध्ये स्वयं वाढणारी रानभाजी आहे. उन्हाळ्याच्या दिवसात शरीराला थंडावा मिळावा म्हणून ही भाजी खास करून बनविल्या जाते. या भाजीचा झुणका अतिशय चविष्ट बनतो. भाकरी, चपाती यासोबत चिवळीच्या भाजीचा झुणका कांदा, हिरवी मिरची कैरी टाकून केलेला खास झुणका शहरासह ग्रामीण भागात मोठ्या आवडीने घरोघरी केल्या जातो. त्या झुणक्याची मजाच काही और आहे. त्यामुळे या भाजीची मागणी सुद्धा अलीकडे वाढली आहे.

चिवळीची भाजी रक्त शुद्ध करणारी, शरीरातील उष्णता कमी करणारी व इतर व्याधीवर गुणकारी असल्याचे जुनी जेष्ठ मंडळी सांगतात. शेतात सातत्याने वापरला जाणार्या रासायनिक फवार्यामुळे ही अतिशय गुणकारी असलेली भाजी नामशेष होऊ नये, ही रानभाजी टिकवणे अतिशय महत्त्वाचे आहे. विदर्भातील खाद्य संस्कृतीतील ही रानभाजी नष्ट होऊ नये म्हणून कृषी विभाग आणि शेतकर्यांनी काळजी घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. या रानभाजीला राज्यभरात ओळख प्राप्त करून दिल्यास भविष्यात उन्हाळ्याच्या दिवसात शेतकर्यांचे प्रमुख पीक म्हणून भाजीला महत्त्व प्राप्त होईल आणि शेतकर्याला आर्थिक मदत होईल.

### शेतकर्यांसाठी फायदेशीर ठरू शकते

उन्हाळ्यामध्ये भाजीपाल्याची आवक कमी असते. चिवळीची भाजी शेतकर्यांना उत्पन्न देऊ शकते. कमी कालावधीत कमी खर्चात येणारे हे पीक आहे. अडचणीच्या काळात हे पीक आर्थिक आधार ठरू शकते. या रानभाजीला शासनाच्या कृषी विभागाने राज्यस्तरावर विशेष महत्त्व प्राप्त करून द्यावे.

**शुभंम निमकाळे** शेतकरी, भंडाराज ता. अंजनगाव सुर्जी.

# नरसापूरच्या अमानवीय अत्याचारा विरोधात संतापाचा ज्वालामुखी

## पीडित बालिकेला न्यायासाठी परतवाड्यातून एल्गार!

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७परतवाडा :–** पुणेजवळील नरसापूर येथे एका ६५ वर्षीय नराधमाने ४ वर्षीय निष्पाप बालिकेवर अमानुष अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेविरोधात संतापाची लाट उसळली असून, अचलपूर परतवाड्यातही तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्रीय ब्राह्मण मंडळ, परतवाडा यांच्या वतीने मा. उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांना निवेदन सादर करण्यात आले.




या निवेदनात आरोपीविरुद्ध खटला जलदगती न्यायालयात चालवून त्याला कठोरात कठोर–फाशीची शिक्षा देण्याची ठाम मागणी करण्यात आली.मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवत म्हटले की, अशा नराधमांना समाजात कोणतीही जागा नाही. एका निष्पाप बालिकेचे आयुष्य संपवणाऱ्याला तात्काळ आणि कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अन्यथा कायद्यावरील विश्वास डळमळीत होईल. समाजातील महिलांवर आणि लहान मुलींवर वाढत्या अत्याचारांच्या घटनांकडे गांभीर्याने पाहून शासनाने अधिक कठोर पावले उचलावीत, अशीही मागणी करण्यात आली.निवेदनाद्वारे प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला की, या प्रकरणात विलंब किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. पीडित बालिकेला न्याय मिळवून देण्यासाठी समाज एकवटला असून, दोषींना शिक्षा होईपर्यंत लढा सुरूच राहील.या वेळी मंडळाच्या अध्यक्षा सौ. पल्लवी धर्माधिकारी, सचिव नितीन काशीकर, डॉ वनश्री देशपांडे, डॉ. रवींद्र खजुरकर, विजय धर्माधिकारी, सतीश जोशी, श्रीराम अडकीने, संदीप चापोरकर, महेंद्र वाते, सुदेश पट्टलवार, विश्राम कुळकर्णी, जयंत गावपांडे, माधुरी भवाळकर, अपर्णा काशीकर, अर्चना धर्माधिकारी, मंजिरी गावपांडे, प्रमोद धर्माधिकारी, मुकुंद भारतीय, मुकेश पांगारकर, वैदेही कोरान्ने, सोनाली मोरे, निलेश जोशी, वीणा धर्माधिकारी आदी उपस्थित होते.निष्पाप बालिकेला न्याय मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही! तिला यूपी स्टाईल न्याय मिळवून द्यावा अशा संतप्त प्रतिक्रिया उपस्थितितांकडून उमटत होत्या.

# जिल्ह्यात नोंदणीकृत १० हजार शेतकऱ्यांना दिलासा

## चना २९ मे, तूर खरेदीस ३१ मे पर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७अमरावती–** केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या चणा व तूर खरेदी प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आल्याने जिल्ह्यातील सुमारे १० हजार शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चना खरेदीस २९ मेतरतूर खरेदीस ३१ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



मध्यंतरी तांत्रिक कारणांमुळे चना खरेदी प्रक्रिया थांबली होती तसेच उद्दिष्टही पूर्ण झाले होते. तूर खरेदीची अंतिम मुदत १ मे तर चना खरेदीची अंतिम मुदत २९ एप्रिल होती. या दरम्यान विदर्भ मार्केटिगफेडरेशनच्या वतीने ११ हजार ३५० शेतकऱ्यांची खरेदीकरिता नोंदणी केली होती. यामध्ये केवळ ६ हजार २४५शेतकऱ्यांचेच धान्य खरेदी करण्यात आल्याने सुमारे ५ हजार १०५ शेतकरी शिल्लक होते. याशिवाय जिल्हा मार्केटिंगच्या सात केंद्रांमध्ये ८ हजार ३०० शेतकऱ्यांची नोंदणी असतानायामधून ३१८० शेतकऱ्यांकडून चणा आणि तूर खरेदी करण्यात आली. त्यामुळे या केंद्रांवर ५ हजार १२० शेतकरी खरेदीच्या प्रतिक्षेत होते. खरेदी अचानक बंद झाल्याने नोंदणीकृत शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर चणा व तूर खरेदी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याकरिता खा.डॉ. अनिल बोंडे व राज्य सहकारी पणन महासंघाचे संचालक नितिन हिवसे यांनी पाठपुरावा केल्याने याला मुदतवाढ देण्यात आली आहे. यानिर्णयामुळेजिल्ह्यातील चणाव तूर उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, उर्वरित शेतमाल खरेदीसाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# रेती माफियांवर पोलिसांचा मोठा दणका

## ८४.१२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७तिवसा**

जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध रेती वाहतुकी विरोधात अमरावती ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई करत मोठा दणका दिला असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नियोजनबद्ध सापळा रचून तीन ट्रक व एक ट्रॅक्टरसह तब्बल ८४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून त्याच अनुषंगाने ५ मे रोजी दोन पथकांनी तिवसा व शेंदूरजना घाट परिसरात गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली. मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर रेतीची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचत प्रथम तिवसा हद्दीत टाटा एसके १६१३ (एमएच २७ बीएक्स ००३९) ट्रक अडवून त्यामधील ५ ब्रास रेतीसह वाहन जप्त केले व फुलचंद मौजीलाल हरसुले (रा. परसापूर, ता. अचलपूर) व निलेश गुलाबराव गुडदे (रा. अमरावती) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात केला. या प्रकरणातील मुद्देमालाची किंमत सुमारे १० लाख ३५ हजार रुपये आहे, त्यानंतर सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर (एमएच ३२ एएस ५२१६) अडवून त्यामधील १ ब्रास रेती जप्त करण्यात आली व अभिषेक प्रवीण मुसळे (वय २२) व अजय देविदास लोखंडे (वय ५६, दोन्ही रा. आष्टी, जि. वर्धा) यांच्यावर कारवाई करण्यात आली.मुद्देमाल सुमारे ७ लाख ७ हजार रुपये आहे. पुढे शेंदूरजना घाट परिसरात कारवाई करत टाटा कंपनीचा टिप्पर (एमएच २७ बीएक्स ५२५८) पकडून त्यामधील ६ ब्रास रेती व दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले व अरविंद भीमराव अंबाडकर (रा. लोणी बेनोडा), क्रिश वासुदेव बडोदे (रा. मिर्जापूर, ता. वरुड) व किशोर बेलसरे (रा. धनोडी, ता. वरुड) यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला असून मुद्देमालाची किंमत २५ लाख ८० हजार रुपये आहे. तसेच दुसरा टिप्पर (एमएच ४० डीसी ३९९९) अडवून त्यामधील ७ ब्रास रेती व दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. शेख जमीर शेख इसा (रा. शेंदूरजना घाट), अल्ताफ शेख बशीर (रा. पुसला) व सय्यद असरार उर्फ बबलू सय्यद अल्ताफ (रा. नरखेड, ता. वरुड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणातील मुद्देमाल ४० लाख ९० हजार रुपये आहे, अशा प्रकारे एकूण ४ वाहनांवर कारवाई करत १९ ब्रास रेतीसह एकूण ८४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई एपीआय अमोल मुडे, पोलिस उपनिरीक्षक नितीन इंगोले, पोलिस अमलदार युवराज मानमोठे, रवींद्र वर्हाडे, सुनील महात्मे, चेतन दुबे, स्वप्नील तवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, चालक प्रज्वल राऊत व नवीन शहा यांनी केली.



# प्रा. दिनेश सूर्यवंशी भाजपाचे विदर्भ संयोजक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती–** भारतीय जनता पार्टीचे संघटन व कार्यविस्तारासाठी विभागास्तरावर समन्वयक संयोजक आणि सहसंयोजक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विदर्भाच्या संयोजकपदाची जबाबदारी अमरावतीचे भाजपा नेते प्रा. दिनेश सूर्यवंशी यांच्यावर देण्यात आली आहे.



प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे हे विदर्भाचे समन्वयक असतील तर आ. प्रवीण दटके हे सहसंयोजक पदाची धुरा सांभाळणार आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी काल रात्री या नियुक्त्या जाहीर केल्या. येत्या काळात पक्ष समन्वय तसेच सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नियुक्त करण्यात आलेल्या या पदाधिकार्यांवर राहणार आहे. प्रा. सूर्यवंशी यांनी पक्षात आतापर्यंत विविध पदांवर काम केले आहे. अमरावती ग्रामीण जिल्ह्याचेही ते अध्यक्ष राहीले आहेत. त्यांच्या नियुक्तीचे भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून जोरदार स्वागत होत आहे.

# सहकारी संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिकारी निवडीसाठी ३१ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्याद्वारे जिल्ह्यातील 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी आणि प्राधिकृत अधिकाऱ्यांची २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेअंतर्गत, सहकार कायदा, निवडणूक नियम आणि संबंधित कामकाजाचा पुरेसा अनुभव असलेल्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने शासकीय विभागातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी, तसेच अर्बन बँक फेडरेशन, पतसंस्था फेडरेशन, साखर कारखाना महासंघ यांसारख्या स्तरावरील फेडरल संस्थांमध्ये कार्यरत किंवा सेवानिवृत्त असलेल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त, अनुभवी वकील, सनदी प्रमाणित लेखापरीक्षक (उ–), स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सेवानिवृत्त शिक्षक आणि खाजगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त शिक्षकही या पदासाठी पात्र ठरू शकतील. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज आणि प्रतिज्ञापत्र दिनांक ३१ मे २०२६ पर्यंत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती, सहकार संकुल, कांता नगर या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करणे बंधनकारक आहे. या निवडीबाबतच्या सविस्तर अटी, शर्ती आणि अर्जाचा नमुना राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या (http://scea.maharashtra.gov.in) आणि सहकार आयुक्त कार्यालयाच्या (http://sahkarayukta.maharashtra.gov.in) अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. उमेदवारांनी विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# प्रलंबित देयकांमुळे कंत्राटदार संतापले

## शासनाने लक्ष न दिल्यास जिल्ह्यातील सर्व विकासकामे बंद पडणार


**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत विविध विकासकामांची तब्बल १०३२ कोटी रुपयांची देयके गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत. यामुळे संबंधित कंत्राटदार मोठ्या आर्थिक कोंडीत सापडले असून, ही कोंडी त्वरित दूर करावी, अशी मागणी अमरावती डिस्ट्रिक्ट कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र गुल्हाने यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही देणी १ एप्रिल २०२६ पर्यंतची असून त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. या रकमेच्या मागणीसाठी वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे, परंतु अद्याप त्यावर कोणताही तोडगा निघालेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर कार्यालयप्रमुखांनी दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार कंत्राटदारांनी इमारती, रस्ते, पूल तसेच इतर योजनांमधील कामे पूर्ण केली आहेत.

मात्र, या सर्वच विभागांतील कामांची देयके प्रलंबित राहिली आहेत. निधीचा अभाव हेच कारण नेहमी पुढे केले जात असल्याने मजुरांची मजुरी, साहित्याचे देणे आणि बँकांचे हप्ते थकले आहेत. कंत्राटदारांवर यामुळे मोठा आर्थिक भार पडत आहे. असोसिएशनच्या माहितीनुसार, केवळ एका विशिष्ट विभागाचे नव्हे, तर रस्ते विकास, इमारत बांधकाम, दुरुस्ती आणि विशेष दुरुस्ती अशा प्रत्येक लेखाशीर्षावरील देयके थकीत आहेत. मार्च महिना संपून नवीन आर्थिक वर्ष (२०२६-२७) सुरू झाले असले तरी, मागील वर्षातील कामांचा निधी न मिळाल्याने कामांची गती प्रचंड मंदावली आहे. अनेक कंत्राटदारांनी बँकांकडून कर्ज काढून किंवा स्वतःची मालमत्ता गहाण ठेवून शासकीय कामे पूर्ण केली आहेत.शासनाकडून देयके प्राप्त न झाल्यामुळे बँकांचे व्याज वाढत आहे. मजुरांना पैसे देण्यास नसल्यामुळे कंत्राटदारांवर सामाजिक आणि मानसिक दबाव वाढत आहे. ही परिस्थिती अशीच कायम राहिल्यास कंत्राटदारांवर टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येईल, असा इशारा संघटनेने पालकमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात दिला आहे. या निवेदनावर अध्यक्ष रवींद्र गुल्हाने यांच्यासह सचिव प्रमोद काकडे, कोषाध्यक्ष गोपाल राठी, माजी अध्यक्ष नितीन भेटाळु, प्रकाश राऊत, गजानन लकड, प्रदीप चढ्ढा, अनुराग लढ्ढा, दयाशंकर केशरवाणी, सुनील खांडे, रोहित देशमुख, संजय राठी, नरेंद्र दापूरकर, दिनेश देशमुख, वैभव अनासाने, अतुल टिंगणे, प्रवीण सोइतकर आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.कंत्राटदार असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र गुल्हाने म्हणाले, प्रलंबित देयकांमुळे कंत्राटदार पूर्णपणे कोलमडला आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास जिल्ह्यातील सर्व विकासकामे बंद पाडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

# भाजप शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा ११ मे रोजी अभिष्टचिंतन सोहळा





### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार कार्यक्रम
### विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

भाजपचे अमरावती शहर व जिल्हा अध्यक्ष, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष तसेच जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ मे रोजी भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने शहरात विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.डॉ. धांडे यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.अमरावती शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सोमवार, ११ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.या प्रसंगी भाजपचे प्रदेश महामंत्री तथा अमरावती प्रभारी आ. संजय कुटे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, भाजपचे मुख्य प्रतोद आ. रणधीर सावरकर, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी राज्यमंत्री आ. परिणय फुके, आ. प्रताप अडसड, आ. रवी राणा, आ. प्रवीण तायडे, आ. उमेश यावलकर, आ. राजेश वानखडे, आ. केवलराम काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.याशिवाय आ. सुलभाताई खोडके, आ. संजय खोडके, राष्ट्रीय ओबीसी आयोगाच्या सदस्या किरणताई महल्ले, आ. गजानन लवटे, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार प्रवीण पोटे, माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, सुनील देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, रविराज देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, तसेच विविध पक्षांचे व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले. डॉक्टर नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ मे रोजी सकाळी विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात महाआरती करण्यात येणार असून त्यानंतर स्थानिक गोरक्षण येथे लापशी तुला करण्यात येणार आहे. यासोबतच शहराच्या विविध भागात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे अशी माहिती आयोजन समितीने दिली.अभिष्टचिंतन सोहळ्याला भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.-

# २० मे रोजी औषधी विक्रेत्यांचा देशव्यापी बंद

## छोटे व्यवसाय अडचणीत आल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-**

बेकायदेशिरपणे ऑनलाईन औषधी विक्री वाढली असून कार्पोरेटव्दारे अव्यावसायिक स्पर्धेविरोधात २० मे रोजी औषध विक्रेत्यांनी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. सरकारकडून सातत्याने मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप राज्यस्तरीय संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. औषधी व्यवसाय हा ड्रग्स अ‍ॅन्ड कास्मेस्टिक्स अ‍ॅक्टनुसार चालविला जातो, यामध्ये ऑनलाईन औषध विक्रीबाबत कोणतीही तरतूद नाही. केंद्र सरकारने ऑनलाईन औषधी विक्रीबाबत नोटिफिकेशन जारी केले होते, मात्र त्याच अद्याप कायद्यामध्ये रुपांतर झाले नाही, त्यामुळे देशभरात सर्रासपणे ऑनलाईन औषधी विक्री जोरात सुरु असल्याचा विक्रेत्यांचा आरोप आहे. कोरोना काळात सरकारने औषधांच्या घरपोच सेवेला मंजूरी




दिली होती, मात्र कोरोना संपून पाच वर्षे उलटली तरी सुद्धा ऑनलाईन औषधी सुरूच आहे. कार्पोरेट कंपन्यांकडून अव्यावसायिक स्पर्धा निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे छोटे व्यावसायिक अडचणीत येत असून ग्रामीण भागातील औषधी व्यवसाय धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. औषधी विक्रेत्यांवर होत असलेल्या या अन्यायाविरोधात सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी २० मे रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आला असून त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील सर्व विक्रेते सहभागी होत असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

### अखेर पेन्शनचा तिढा सुटला!

### महाराष्ट्र शासनाचा ऐतिहासिक निर्णय

# सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची नियमावली जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती** राज्यातील कर्मचाऱ्यांना कोणती निवृत्तीवेतन योजना लागू होणार, याबाबत संदिग्ध स्थिती होती. नुकत्याच झालेल्या राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षक संघटनाच्या संपात याविषयी मागणी रेटण्यात आली होती.तसेच जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होणार नाही, हे सुद्धा शासनाने स्पष्ट केले होते. त्याचवेळी सुधारित योजनेबाबत लवकरच आदेश काढण्याची हमी दिली होती. अखेर बुधवारी त्यावर महाराष्ट्र शासनाने आदेश काढला आहे. राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (छझड) अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी 'सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना' लागू करण्याची सविस्तर कार्यपद्धती एका शासन परिपत्रकाद्वारे जाहीर केली आहे. या निर्णयामुळे १ मार्च २०२४ पासून



सेवेत असलेल्या आणि या योजनेचा पर्याय निवडणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.संबंधित कर्मचाऱ्याच्या निवृत्तिवेतनाच्या ६०% रक्कम कुटुंब निवृत्तिवेतन म्हणून देय असेल.व्याप्ती आणि अन्य लाभ मिळणार.ही योजना केवळ शासकीय कर्मचाऱ्यांपुरती मर्यादित नसून, जिल्हा परिषद कर्मचारी, अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी आणि बिगर-कृषी विद्यापीठांमधील छझड धारक कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आली आहे. तसेच, या कर्मचाऱ्यांना ३१ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्ती उपदान (ऋीर्रीीळीूं) देखील लागू राहील. मात्र, राजीनामा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही; त्यांना केवळ मूळ छझड चे लाभ मिळतील.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे लाखो कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षेचा मार्ग मोकळा झाला असून, प्रशासकीय स्तरावर याची अंमलबजावणी आता युद्धपातळीवर सुरू होणार आहे.

# नेरपिंगळाईत शेतातील साहित्य चोरीच्या घटनांना उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नेरपिंगळाई** - परिसरात शेतातील साहित्य चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून शेतकरी वर्गात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी रणजीतसिंह काकस यांच्या शेतातून तब्बल १६ पितळी स्प्रिंकलर नोझलची चोरी झाली. यापूर्वीसुद्धा परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून पाईप, स्प्रिंकलर नोझल, सौरऊर्जा बॅटरी यांसारख्या महत्त्वाच्या साहित्यांची चोरी झाली आहे. मात्र, प्रत्येक वेळी शेतकरी पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवूनही आजपर्यंत एकाही चोरीचा ठोस तपास लागलेला नाही. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढत असून ते अधिक बेधडकपणे गुन्हे करीत आहेत. शेतकरी आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे, वाढत्या खर्चामुळे आणि कमी उत्पादनामुळे आर्थिक



अडचणीत सापडलेला आहे. अशातच शेतातील साहित्य चोरी होणे म्हणजे त्याच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हजारो रुपयांचे नुकसान सहन करत शेतकरी हतबल झाला आहे. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, पोलीस प्रशासनाकडून या घटनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. रात्री गस्त नसणे, संशयितांवर कोणतीही कारवाई न होणे आणि तपासात उदासीनता ही परिस्थिती अधिकच गंभीर बनवत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. जर वेळेत कठोर पावले उचलली नाहीत, तर येत्या काळात या चोरीच्या घटना आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने तातडीने लक्ष घालून दोषींना अटक करावी, रात्रीची गस्त वाढवावी आणि शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# विकसित महाराष्ट्रसाठी राज्यस्तरीय शहरी संवाद अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-** विकसित महाराष्ट्र २०४७ या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासह शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करण्यासाठी यशदा, पुणे येथे राज्यस्तरीय शहरी संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अ. भा. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात राज्यातील महापौर, पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन खा. मेघा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. त्यांनी पारदर्शक, नागरिकाभिमुख प्रशासनावर भर दिला. या प्रसंगी महापौर श्रीचंद तेजवानी यांचा विशेष सत्कार केला.

महापौर तेजवानी यांनी शहराच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान, स्वच्छता, जलसंवर्धन,पायाभूत सुविधांवर भर देणार असल्याचे सांगितले. विकसित महाराष्ट्र २०४७ हे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रशासन, नागरिकांचा



सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अ. भा. स्थानिक स्वराज्य संस्थेचे महासंचालक जयराज फाटक उपमहासंचालक रवी रंजन गुरु यांनी डिजिटल गव्हर्नन्स, आर्थिक स्वावलंबनावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी खा.मेघा कुलकर्णी, महापौर श्रीचंद तेजवानी , समीर राजूरकर , रूपाराणी निगम , अश्विनी निगम उपस्थित होते.

# जि.प. कर्मचाऱ्यांच्या बदल्या ९, १० मे रोजी

## कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य, वित्त, मबाक विभागांतील कर्मचाऱ्यांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-** अमरावती जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया ९ आणि १० मे रोजी सुरू होणार आहे. या दोन दिवसांत समुपदेशन आणि बदलीचे आदेश एकाच वेळी दिले जातील.

जिल्हा परिषदेतील एकूण कर्मचाऱ्यांपैकी साधारणतः १० टक्के कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय आणि तेवढ्याच कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार बदल्या केल्या जातात.

मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाने या बदली प्रक्रियेची तयारी केली आहे. ही प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात सकाळी १० वाजल्यापासून सुरू होईल. यामध्ये प्रशासकीय, विनंती आणि आपसी (म्युच्युअल) बदल्यांचा समावेश आहे.

९ मे रोजी महिला व बाल विकास, पशुसंवर्धन, वित्त, कृषी आणि आरोग्य विभागातील (आरोग्य सेवक/सहाय्यक पुरुष) संवर्गासाठी बदली प्रक्रिया राबवली जाईल. तर, दुसऱ्या दिवशी म्हणजेच १० मे रोजी आरोग्य विभागातील उर्वरित सर्व संवर्गांच्या बदल्यांचे समुपदेशन केले




जाईल.

बदली प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम ठरवण्यात आला आहे. या प्रक्रियेदरम्यान 'पती-पत्नी एकत्रीकरण' आणि '५३ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या विनंती' या बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल. या निर्णयामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजात अधिक स्पष्टता आणि शिस्त येण्याची अपेक्षा आहे.

बदली प्रक्रियेमध्ये काही विशिष्ट कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. यामध्ये गंभीर आजार (जसे की पक्षाघात, हृदय शस्त्रक्रिया, कॅन्सर, किडनी विकार), दिव्यांग कर्मचारी, मतिमंद मुलांचे पालक आणि स्वातंत्र्य सैनिकांचे वारस यांचा समावेश आहे. तसेच, आदिवासी भागातून गैर-आदिवासी भागात येणाऱ्या आणि तीन वर्षे सलग सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांनाही प्राधान्यक्रमानुसार संधी दिली जाईल.

# मेळघाटातील कढावमध्ये पाणीटंचाई, सीईओंचे टँकर पुरवठ्याचे आदेश

## टँकरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या गावांची संख्या आता ९ वर पोहोचली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-**

मेळघाटच्या धारणी तालुक्यातील कढाव येथे पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सत्यम गांधी यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे मेळघाटातील टँकरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या गावांची संख्या आता नऊवर पोहोचली आहे. कढाव गावात पाण्याचा कोणताही स्थानिक स्रोत उपलब्ध नाही. यापूर्वीच चिखलदरा तालुक्यातील आठ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे कढावच्या समावेशाने टंचाईग्रस्त गावांची संख्या वाढली आहे.सीईओ गांधी यांनी मेळघाट भागाची वास्तविकता जाणून घेण्यासाठी नुकताच दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामस्थांनी पाणीटंचाईबाबत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरोधात तक्रारी केल्या. वारंवार सूचना देऊनही अधिकारी उपाययोजना करत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे होते. या तक्रारींची दखल घेत सीईओ गांधी यांनी ग्रामपंचायत निधीतून विहिरींचे खोलीकरण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे, तसेच बोरवेलमध्ये अतिरिक्त पाइप बसवण्याचे आदेश दिले. ही कामे पूर्ण होईपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. कढाव येथील भेटीनंतर सीईओ गांधी यांनी ढाकणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आरोग्यविषयक कामांचा आढावा घेतला. तसेच, सावऱ्या येथे पाणीपुरवठ्याची स्थिती तपासली. बोरिखेडा येथे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नळांना तोट्या बसवून आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.




ग्रामस्थांच्या तक्रारींच्या अनुषंगाने, गट विकास अधिकाऱ्यांनी विस्तार अधिकारी पंचायत यांना गावात पाठवून पुढील पाच दिवसांत समस्या सोडवण्याचे निर्देश दिले आहेत. अन्यथा, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा सीईओ सत्यम गांधी यांनी दिला. दुर्गम आदिवासी भागांतील पाणीटंचाई लक्षात घेता, सुरू असलेल्या उपाययोजनांचा प्रत्यक्ष आढावा घेणे हा त्यांच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश होता. विविध योजनांची अंमलबजावणी, निधीचा वापर आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या सेवांची पडताळणीही यावेळी करण्यात आली. चिखलदरा तालुक्यात यापूर्वीच सेमाडोहसह आठ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. या गावांमध्ये दिवसातून दोन ते तीन वेळा पाणीपुरवठा केला जातो. सध्या एकूण १९ टँकरद्वारे पाणी पुरवले जात असून, आता कढावचाही त्यात समावेश झाला आहे.

मेळघाटच्या धारणी तालुक्या तील कढाव येथे पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सत्यम गांधी यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे मेळघाटातील टँकरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या गावांची संख्या आता नऊवर पोहोचली आहे.कढाव गावात पाण्याचा कोणताही स्थानिक स्रोत उपलब्ध नाही. यापूर्वीच चिखलदरा तालुक्यातील आठ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे कढावच्या समावेशाने टंचाईग्रस्त गावांची संख्या वाढली आहे. सीईओ गांधी यांनी मेळघाट भागाची वास्तविकता जाणून घेण्यासाठी नुकताच दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामस्थांनी पाणी टंचाई बाबत ग्रामपंचायत अधिका ऱ्यांविरोधात तक्रारी केल्या. वारंवार सूचना देऊनही अधिकारी उपाययोजना करत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे होते.या तक्रारींची दखल घेत सीईओ गांधी यांनी ग्रामपंचायत निधीतून विहिरींचे खोलीकरण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे, तसेच बोरवेलमध्ये अतिरिक्त पाइप बसवण्याचे आदेश दिले. ही कामे पूर्ण होईपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# बडनेरा येथे अतिक्रमण कारवाईदरम्यान थरार

## आंबा विक्रेत्याकडून अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न

### नागरिकांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बडनेरा**

बडनेरा परिसरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान बुधवारी मोठा थरार पाहायला मिळाला. प्रशासनाच्या कारवाईमुळे संतप्त झालेल्या एका आंबा विक्रेत्याने अधिकाऱ्यांसमोरच स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या सतर्कतेमुळे वेळेत हस्तक्षेप करण्यात आला आणि संभाव्य मोठा अनर्थ टळला.मिळालेल्या माहितीनुसार, बडनेरा परिसरातील रस्त्यालगत करण्यात आलेले अतिक्रमण हटवण्यासाठी स्थानिक प्रशासन, महसूल विभाग आणि



नगरपालिका प्रशासनाकडून संयुक्त मोहीम राबविण्यात येत होती. या कारवाईदरम्यान अनेक हातगाड्या, फळ विक्रेते आणि तात्पुरती दुकाने हटविण्यात येत होती. याच वेळी एका आंबा विक्रेत्याने आपल्या व्यवसायावर कारवाई होत असल्याने संताप व्यक्त केला.प्रशासनाची कारवाई सुरू असतानाच संबंधित विक्रेत्याने अचानक पेट्रोलची बाटली काढून स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतले. हा प्रकार पाहताच परिसरातील नागरिक, व्यापारी आणि काही कर्मचाऱ्यांनी तत्काळ धाव घेत त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. काहींनी त्याच्या हातातील बाटली हिसकावून घेतली, तर इतरांनी त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली.घटनेनंतर काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. अतिक्रमण कारवाईविरोधात काही व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली, तर प्रशासनाने ही कारवाई नियमानुसार सुरू असल्याचे स्पष्ट केले. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी संबंधित विक्रेत्याची समजूत काढून त्याला सुरक्षित ठिकाणी हलवले.या प्रकारामुळे अतिक्रमण हटाव मोहिमांदरम्यान निर्माण होणारा तणाव पुन्हा एकदा समोर आला आहे. रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाल्याने अनेक छोटे व्यावसायिक संतप्त होत असल्याचे चित्र आहे. प्रशासनाने कारवाई करताना मानवी दृष्टिकोन ठेवावा, अशी मागणी स्थानिक व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या संपूर्ण घटनेची पुढील चौकशी सुरू असून परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

# अमरावतीत पाणीपुरवठा ठप्प

## नांदगाव पेठजवळ मुख्य पाईपलाईन फुटली

### शहराचा पाणी पुरवठा बंद होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी नांदगाव पेठ चखऊ परिसरातील माहुली जहागीरजवळ आज दुपारच्या सुमारास अचानक फुटल्याने शहराचा पाणीपुरवठा तात्पुरता बंद करण्यात आला आहे. पाईपलाईन फुटल्यानंतर हजारो लिटर पाणी परिसरातील शेतात घुसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पिकांसह शेतीमालाचेही नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित




विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. पाईपलाईन दुरुस्त होईपर्यंत अमरावती शहरातील काही भागांमध्ये पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# वादळाचा कहर; महावितरणच्या वीज यंत्रणेला मोठा फटका

## दुरुस्ती कामाला युद्धपातळीवर गती, नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती,** अमरावती जिल्ह्यात आज दुपारी आलेल्या प्रचंड वादळामुळे महावितरणच्या वीज यंत्रणेला मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी वीजवाहिन्या आणि पोल कोसळल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने तातडीने दुरुस्ती कामाला सुरुवात करत युद्धपातळीवर यंत्रणा कामाला लावली आहे.



महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे आणि उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन नुकसानाची पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या काळात नागरिकांनी संयम राखून सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.वादळाचा सर्वाधिक फटका बडनेरा उपविभागाला बसला आहे. २२० केव्ही कोंडेश्वर अतिउच्चदाब उपकेंद्रातून ३३ केव्ही अंजनगाव बारी उपकेंद्राला वीजपुरवठा करणाऱ्या वाहिनीचे तब्बल पाच पोल कोसळले असून वाहिनीचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच अंजनगाव बारी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ केव्ही अडगाव आणि ११ केव्ही अंजनगाव बारी या उच्चदाब वाहिन्यांचे सात पोल जमिनदोस्त झाले आहेत.वादळाचा वेग एवढा तीव्र होता की अनेक ठिकाणी लोखंडी पोलही वाकल्याचे दिसून आले. लघुदाब वाहिन्यांच्या नुकसानीचा अंदाज घेण्याचे काम अद्याप सुरू असून काही भागातील वीजपुरवठा खंडित आहे.


दरम्यान, महावितरणचे कर्मचारी, व्ही.आर. टेक आणि लक्ष्मी इलेक्ट्रिकल्स या कंत्राटदार संस्थांचे पथक नव्या साहित्यांसह विविध ठिकाणी दुरुस्तीचे काम करत आहेत. वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

# कोनार्क मालकावर स्थायी समितीत नगरसेवकांचा हल्लाबोल

## संतप्त जेठानी बैठक अर्ध्यात सोडून निघून गेले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

महानगर पालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेवरून पुन्हा एकदा प्रचंड गदारोळ उडाला असून, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या मालकाला स्थायी समितीच्या बैठकीत नगरसेवकांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागले. गेल्या अनेक महिन्यांपासून शहरातील ढासळलेल्या स्वच्छता व्यवस्थेमुळे नागरिक त्रस्त असताना, अखेर महानगरपालिका प्रशासनाने कंपनीच्या प्रमुखांनाच जाब विचारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र या बैठकीतही कोणतेही ठोस आश्वासन न मिळाल्याने वातावरण अधिकच तापले.स्थायी समितीचे अध्यक्ष अविनाश मार्डीकर यांनी मुंबईस्थित कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे मालक नंदुसेठ जेठानी यांना तातडीने हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार बुधवारी स्व. सुदामकाका देशमुख सभागृहात स्थायी समितीची विशेष बैठक पार पडली. बैठकीला स्थायी समितीचे १६ सदस्य, आरोग्य विभागाचे अधिकारी आणि संबंधित पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत बाहेरील कुणालाही प्रवेश देण्यात आला नव्हता.बैठक सुरू होताच



नगरसेवकांनी कोनार्क कंपनीच्या कामकाजावर तुफान संताप व्यक्त केला. शहरातील अस्वच्छ रस्ते, वेळेवर न होणारी कचरा उचल, नाल्यांची दुरवस्था, नागरिकांच्या तक्रारी आणि वाढती नाराजी यावरून सदस्यांनी जेठानी यांना धारेवर धरले. अनेक नगरसेवकांनी शहराला कचराकुंडी बनवले, नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नका अशा शब्दांत संताप व्यक्त केल्याचे समजते. वाद वाढत असताना वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले. तब्बल अनेक तास चाललेल्या या चर्चेदरम्यान नगरसेवकांकडून सातत्याने होत असलेल्या सवालांच्या भडिमारामुळे नंदुसेठ जेठानी संतप्त झाले आणि कोणतेही स्पष्ट उत्तर न देता अचानक बैठक अर्ध्यातच सोडून निघून गेले. त्यांच्या या भूमिकेमुळे उपस्थित सदस्यांचा संताप आणखी वाढला.जेठानी बैठकीतून निघून गेल्यानंतर सर्व सदस्यांनी स्थायी समिती अध्यक्ष अविनाश मार्डीकर यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. कोनार्क कंपनीच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांसह नगरसेवकही त्रस्त झाले आहेत. मालक बैठकीत येणार म्हणून मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र उत्तरांऐवजी त्यांनी पलायन केले, अशी भावना सदस्यांनी व्यक्त केली.दरम्यान, या घटनेनंतर कोनार्क कंपनीविरोधात अधिक कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली असून, महानगर पालिकेची पुढील भूमिका काय असणार याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# अमरावती जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस

## शेतपिकांना फटका; उकाड्यापासून नागरिकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताकदि. ७ अमरावती,** हवामान विभागाने दिलेला अंदाज गुरुवारी अचूक ठरला असून अमरावती जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. अमरावती शहरासह तिवसा, मोर्शी, शिरजगाव मोझरी, सालोरा परिसरात दुपारनंतर अचानक काळे ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांची धावपळ उडाली तर शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तीव्र उष्णतेची लाट जाणवत होती. तापमानात मोठी वाढ झाल्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र गुरुवारी सायंकाळी आलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना



उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. अनेक ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या तुटल्याच्या घटना घडल्या तर काही भागांत अल्पकाळ वीजपुरवठाही खंडित झाला.दरम्यान, या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मोर्शी, तिवसा आणि परिसरातील शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला कांदा, तीळ तसेच भाजीपाला पावसात भिजल्याने नुकसान होण्याची भीती आहे. अनेक शेतकरी पिके सुरक्षित करण्यासाठी धावपळ करताना दिसून आले. आधीच बाजारभाव आणि उत्पादन खर्चाच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता अवकाळी पावसाचे नवे संकट उभे ठाकले आहे.हवामान विभागाने पुढील काही तासांतही जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता व्यक्त केली असून सायंकाळी आणि रात्रीच्या सुमारास काही भागांत पुन्हा मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला आहे. नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी तसेच शेतकऱ्यांनी काढलेले पीक सुरक्षित ठिकाणी ठेवावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# अमरावतीत शाही विवाह सोहळ्याची चर्चा

## नवरीची हत्तीवरून निघाली भव्य वरात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती शहरात बुधवारी पार पडलेल्या एका भव्य आणि अनोख्या विवाह सोहळ्याने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. श्री रुक्मिणी विदर्भ पीठ, कौंडण्यपूर येथील जगद्गुरु स्वामी श्री राम राजेश्वराचार्य माऊली सरकार यांच्या मानस कन्येचा विवाह अत्यंत थाटामाटात आणि पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला. धार्मिक वातावरण, राजेशाही





थाट आणि सांस्कृतिक वैभव यांचा सुंदर संगम या विवाह सोहळ्यात पाहायला मिळाला.या विवाह सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण ठरली नवरीची हत्तीवरून काढण्यात आलेली शाही वरात. विशेष सजविण्यात आलेल्या हत्तीवर नवरी विराजमान झाली होती. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही भव्य वरात काढण्यात आली. वरातीदरम्यान फुलांची उधळण, पारंपरिक वेशभूषा आणि आकर्षक रोषणाईमुळे वातावरण अधिकच देखणे झाले होते. हत्तीवरून निघालेल्या नवरीच्या या अनोख्या मिरवणुकीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. अनेकांनी या सोहळ्याचे छायाचित्रण आणि व्हिडीओ शूटिंग करून हा क्षण आपल्या मोबाईलमध्ये कैद केला.विवाह सोहळ्याला अधिक रंगत आणण्यासाठी दक्षिण भारतातून खास साउथ इंडियन बँड पथकाला निमंत्रित करण्यात आले होते. बँडच्या दणदणीत वादनाने आणि पारंपरिक धूनांनी संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला. ढोल-ताशे, पारंपरिक वाद्ये आणि बँडच्या तालावर उपस्थितांनी आनंद व्यक्त केला.या शाही विवाह सोहळ्यास देशभरातील विविध भागांतून आलेले साधू-संत, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, भाविक तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. विवाहस्थळी आकर्षक सजावट, भव्य मंडप आणि पारंपरिक विधींमुळे सोहळ्याला वेगळेच वैभव प्राप्त झाले होते.अमरावती शहरात अशा प्रकारचा राजेशाही आणि धार्मिक परंपरेचा संगम असलेला विवाह सोहळा क्वचितच पाहायला मिळतो. त्यामुळे या विवाहाची चर्चा सध्या संपूर्ण शहरात रंगत असून नागरिकांमध्येही या अनोख्या सोहळ्याबद्दल उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

# डीजे बंद करण्यास सांगितल्याच्या रागातून पोलीस पाटलाला मारहाण; तिघांना तीन महिने कारावास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौलखेडा बाजार येथे पाच वर्षांपूर्वी पोलीस पाटलाला शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी अचलपूर येथील सत्र न्यायालयाने तिघा आरोपींना तीन महिने सक्तमजुरी आणि प्रत्येकी दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हा निकाल जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक २ यांच्या न्यायालयाने बुधवारी (दि. ६ मे) दिला.सय्यद मन्नान सय्यद रज्जाक (वय ५५), सय्यद सलमान सय्यद मन्नान (वय २५, दोघेही रा. गौलखेडा बाजार) आणि शेख परवेज शेख शब्बीर खान (वय ३८, रा. गणेशनगर, परतवाडा) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.घटनेतील तक्रारदार रमेश वसंत महल्ले हे गौलखेडा बाजार येथील पोलीस पाटील आहेत. १५ जून २०२१ रोजी रात्री सुमारे पावणे दहा



वाजताच्या सुमारास आरोपींच्या घरी मोठ्या आवाजात डीजे सुरू होता. आवाजामुळे त्रस्त झालेल्या गावकऱ्यांनी पोलीस पाटील महल्ले यांच्याकडे तक्रार केली आणि डीजे बंद करण्यास सांगण्याची विनंती केली.यावरून महल्ले हे आरोपींच्या घरी गेले आणि त्यांनी डीजेचा आवाज बंद करण्यास सांगितले. मात्र, याचा राग आल्याने आरोपींनी तू कोण सांगणारा? असे म्हणत त्यांना अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर तिघांनी मिळून महल्ले यांना मारहाण केली. विशेष म्हणजे, महल्ले हे शासकीय कर्तव्य बजावत असताना आरोपींनी त्यांच्या कामात अडथळा निर्माण करून हा प्रकार केल्याचे तपासात निष्पन्न झाले.या प्रकरणी चिखलदरा पोलिसांनी रमेश महल्ले यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या कलम ३५३, ३३२, २९४, ५०६ आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला होता. तपासानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.सरकारी पक्षातर्फे ॲड. विचोरे यांनी बाजू मांडली. सुनावणीदरम्यान एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. तत्कालीन एपीआय रूपनर यांनी तपास अधिकारी म्हणून काम पाहिले, तर पोलीस अंमलदार गौरव ठाकूर यांनी पैरवी अधिकारी म्हणून सहकार्य केले.उभय पक्षांचा युक्तिवाद आणि सादर करण्यात आलेले पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने तिन्ही आरोपींना दोषी ठरवले. न्यायालयाने त्यांना तीन महिने सक्तमजुरी व प्रत्येकी दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त १५ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार असल्याचे निकालात नमूद करण्यात आले आहे.-